श्री तुळजाभवानी मंदिर संस्थान
तुळजापूर,जि.धाराशिव (महाराष्ट्र)-४१३ ६०१
दूरध्वनी : ०२४७१ - २४२०३१

Shri Tuljabhavani Temple Trust
Tuljapur, Dist. Dharashiv (Mah.) - 413 601
Tel. : 02471 - 242031

Web Site: https://www.shrituljabhavani.org E-mail : shreetuljabhavanitemple@gmail.com
ISO : 9001 : 2008

# जाहिरात

श्री तुळजाभवानी मंदिर संस्थान, तुळजापूर अंतर्गत श्री तुळजाभवानी मंदिर, प्रशासकीय कार्यालय, तुळजापूर करिता सेवानिवृत्त/अधिकारी कर्मचारी यांना सेवा करार पध्दतीने विवक्षित कामासाठी घेणेबाबत.

संदर्भ :- 1) महाराष्ट्र शासन सामान्य प्रशासन विभाग शासन निर्णय क्र. सीबीई 1525/ प्र.क्र.37/ आस्थामं.(का.13) दिनांक 10 जून 2025
2) मा. विश्वस्त समिती सभा दिनांक 17/10/2025 ठराव क्रमांक 18.03

श्री तुळजाभवानी मंदिर संस्थान, तुळजापूर आस्थापनेवर संदर्भ क्रमांक 01 मधील अटी व शर्ती नुसार करार पध्दतीने गट अ व ब मधील सेवानिवृत्त अधिकारी यांचेकडून विहीत नमुन्यातील अर्ज श्री तुळजाभवानी मंदिर संस्थानचे प्रशासकीय कार्यालयात व्यक्तीश: किंवा टपालाने दिनांक 10/02/2026 ते दिनांक 10/03/2026 या कालावधीत सायंकाळी 5-00 वाजेपर्यंत पोंहचतील अशा बेताने पाठवीण्यांत यावेत. या मुदतीनंतर कोणतेही अर्ज स्विकारले जाणार नाहीत.

गट अ व ब मधील सेवानिवृत्त अधिकारी यांची रिक्त पदे भरावयाचा तपशिल खालील प्रमाणे आहे.

| अक्र | विभागाच नांव | पदसंख्या | अनुभव |
|---|---|---|---|
| 1 | सुरक्षा विभाग | 01 | भा.पो.से./अतिरीक्त पोलीस अधिक्षक/पोलीस उपअधिक्षक/ निमशासकीय सेवेतील तत्सम सक्षम अनुभवी व्यक्ती |
| 2 | प्रशासकीय विभाग | 01 | भा.प्र.से./भा.पो.से. दर्जाचे सेवानिवृत्त अधिकारी, निमशासकीय सेवतील तत्सम सक्षम अनुभवी व्यक्ती |
| 3 | लेखा विभा | 01 | वित्त विभागाचा मुख्य लेखाधिकारी दर्जाचा सेवानिवृत्त अधिकारी / निमशासकीय सेवेतील तत्सम सक्षम अनुभवी व्यक्ती |
| 4 | HR विभाग | 01 | HR क्षेत्रातील सचिव दर्जाचा सविनिवृत्त अधिकारी /निमशासकीय सेवेतील तत्सम सक्षम अनुभवी व्यक्ती |
| 5 | जनसंपर्क /माध्यम विभाग | 01 | त्या त्या क्षेत्रातील उच्च पदावरील सेवानिवृत्त अधिकारी / निमशासकीय सेवेतील तत्सम सक्षम अनुभवी व्यक्ती |

**अ) अर्हता व अनुभव-**

1. विवक्षित कामासाठी लागणारी विशेष अर्हता अथवा संबंधित कामाचा किमान तीन वर्षांचा अनुभव असणे आवश्यक आहे.
2. करार पध्दतीने नियुक्त करावयाचा सेवानिवृत्त अधिकारी शारीरिक, मानसिक वा आरोग्याच्या दृष्टीने सक्षम असावा, तसेच प्रस्तावित सेवेसाठी त्याच्याकडे आवश्यक क्षमता असावी.
3. करार पध्दतीने नियुक्त करावयाच्या सेवानिवृत्त अधिकारी यांच्याविरुध्द कोणतीही विभागीय चौकशीची कारवाई चालू किंवा प्रस्तावित नसावी किंवा अशा चौकशी प्रकरणी कोणतीही शिक्षा झालेली नसावी. अथवा कोणतीही न्यायीक प्रकरण चालु अथवा प्रस्तावीत नसावे.

**ब) वयोमर्यादेची अर्हता-:**

1) अर्ज करणा-या सेवानिवृत्त अधिकारी यांचे कमाल वयोमर्यादा ही 65 वर्षापेक्षा अधिक नसावी.

**क) करार पध्दतीने करावयाच्या नियुक्ती बाबत अटी व शर्ती**

1) करार पध्दतीने नियुक्ती ही जास्तीत जास्त 01 वर्षापर्यंत देण्यांत येईल
2) नियुक्ती कालावधीत मासिक परिश्रामीक भत्ते प्रकरणी संदर्भ क्रमांक 01 शासन निर्णयामधील परिशिष्ट अ प्रमाणे कार्यवाही केली जाईल.
3) परिश्रमिक रकमेची गणना करणेकामी सेवानिवृत्तीपुर्वी मिळत असलेले एकुण वेतन व एकुण आता मिळत असलेले एकुण निवृत्ती वेतन या संबंधातील कागदपत्रे सादर करणे आवश्यक आहे.
4) करार पध्दतीने नियुक्ती देण्यांत आल्यामुळे संबधीतास मंदिर संस्थानच्या कोणत्याही संवर्गात सेवा समावेशनाबाबत/ सामावून घेण्याबाबतचे वा नियमीत सेवेचे इतर कोणतेही लाभ मिळण्याचा अधिकार/हक्क नसेल.
5) नियुक्तीच्या कालावधीत करार पध्दतीने विवक्षित काम पुर्ण करण्याची जबाबदारी सबंधीत व्यक्तीची राहील व तसेच बंधपत्र/हमीपत्र रुपये 1000/- चे नोंदणीकृत स्टॅम्प पेपरवर नियुक्तीच्या वेळी देणे आवश्यक आहे तसेच सदर बंधपत्रात/हमीपत्रात करार पध्दतीने नियुक्ती देताना मंदिर संस्थानने निश्चित केलेल्या अटी व शर्ती, करार पध्दतीने उमेदवाराकडून नियमीत सेवेत घेणेबाबत अथवा इतर कोणत्याही हक्काची मागणी करता येणार नाही याचा समावेश करुन अटी व शर्ती मान्य असल्याचा उल्लेख करारात करण्यांत यावा.
6) असा अधिकारी त्याचेवर सोपवीलेली सेवा पार पाडण्याच्या कामात व्यत्यय निर्माण होईल, अशा कोणत्याही व्यवसायिक कामात गुंतलेला नसावा.
7) अशा अधिकारी यांना Conflict of Interest जाहीर करणे आवश्यक आहे.
8) अशा अधिकारी यांना आवश्यक प्रसंगी दौरा करावा लागल्यास त्यांना त्यांच्या निवृत्ती वेळेच्या वेतनमानास अनुसरुन प्रवास भत्ता व दैनिक भत्ता अनुज्ञेय राहील. अशा करार पध्दतीवरील अधिकारी यांनी त्यांना प्राप्त होणा-या कागदपत्रे/माहिती व आधार सामुग्रीबाबत गोपनीयता पाळणे आवश्यक राहील.
9) नियुक्ती अधिकारी यांनी त्यांचेवर सोपवीलेले कामकाज निश्चीत केलेल्या कालावधीत पुर्ण करणे आवश्यक राहील. त्यांच्या कामाकाजात नियुक्ती प्राधिकारी वेळोवेळी आढावा घेवून कामाचे मुल्यमापन करतील.
10) अर्ज करणा-या सेवानिवृत्त अधिकारी यांनी शेवटच्या पाच वर्षाच्या गोपनीय अहवालाची प्रतवारी सबंधीत कार्यालयाकडून प्रमाणित करुन तसे प्रमाणपत्र सादर करावे. तसेच प्रशस्तीपत्र/ नैपुण्यपुर्वक काम केले असल्यास तसे प्रमाणपत्र अर्जासोबत जोडावे.
11) क्षेत्रीय स्तरावरुन करार पध्दतीने नियुक्त झालेल्या अर्जदारास सेवा कालावधीमध्ये कांही नैसर्गीक अपघात व कांही आजार उद्भवल्यास मंदिर संस्थान बांधील राहणार नाही. त्याबाबत प्रतिपुर्ती दावा करता येणार नाही.
12) करार पध्दतीने नियुक्त झालेल्या अर्जदारास नियुक्तीच्या ठिकाणी आदेश निर्गमीत झालेल्या दिनांकापासुन 15 दिवसांचे आत रुजु होणे बंधनकारक राहील. अन्यथा सदर नियुक्ती आपोआप संपुष्टात येईल.

13) वरील पैकी एकही अट पुर्तता होत नसल्यास अर्जदार यांचा अर्ज अपात्र ठरेल. तसेच अर्ज ज्यांचा अर्ज अपात्र ठरतील त्यांना कांही कळवीले जाणार नाही. तसेच कोणतेही पत्रव्यवहार केला जाणार नाही याची सर्व अर्जदारांनी नोंद घ्यावी.

14) करार पध्दतीने नियुक्त करण्यांत आलेल्या व्यक्तींना कोणत्याही प्रकारचे प्रशासकीय व वित्तीय अधिकार प्रदान करता येणार नाहीत.

**ड) आवश्यक सुचना:**

1) सदर पदाकरीता करावयाच्या अर्जाचा नमुना जाहीरातीसोबत जोडण्यांत आलेला आहे.
2) सदर विहीत नमुन्यातील अर्ज स्वत:च्या हस्ताक्षरात किंवा टंकलिखीत करुन फोटोसह सादर करावयाचा आहे.
3) विहीत नमुन्यात नसलेले व अपुर्ण अर्ज अपात्र समजण्यांत येतील.
4) अर्जामध्ये उमेदवाराने संपुर्ण नांव, पत्रव्यवहाराचा पत्ता, जन्मतारीख, वय, शैक्षणीक अर्हताबाबतचा संपुर्ण तपशिल, कामाचा अनुभव त्याबाबतचा तपशिल इत्यादी माहिती नमुद करणे आवश्यक आहे. अपुर्ण माहिती भरलेले अर्ज अपात्र ठरविणेत येतील
5) अर्जासोबत 22 से. मी. X 12 से. मी. आकाराचा स्वत:चे नांव व पत्त्यासह पोस्टाचे रुपये 10+2 चे तिकीट जोडलेला लिफाफा जोडावा.
6) उमेदवाराने आपले अर्ज समक्ष किंवा पोस्टाव्दारे खालील पत्त्यावर दिनांक 10/03/2026 रोजी सायंकाळी 5-00 वाजेपर्यंत पोंहचतील अशा बेताने पाठवावेत. त्यानंतर पोस्टाव्दारे व अन्य प्रकारे प्राप्त होणा-या अर्जाची अथवा त्यासंबधी कोणत्याही पत्रव्यवहाराची दखल घेतली जाणार नाही.
7) वयाबाबत जन्मतारखेचा दाखला/शाळा सोडल्याचा दाखला/ सेवापुस्तकाचे पहिल्या पानाची प्रत यावरुन ग्राहय धरता येईल. सत्यप्रत जोडणे आवश्यक आहे. अर्जासोबत दाखला जोडला नसल्यास अर्ज आपोआप अपात्र ठरेल.
8) मंदिर संस्थानने सदर भरतीबाबत/नियुक्तीबाबत वेळोवेळी निर्गमीत केलेले मंदिर संस्थान मा. विश्वस्त समिती ठराव/ शासन परीपत्रक आदेश इत्यादी लागु राहतील.
9) वरील पैकी एकाही अटीची पुर्तता होत नसल्यास अर्जदार यांचा अर्ज अपात्र ठरेल. तसेच ज्यांचे अर्ज अपात्र ठरतील त्यांना याबाबत कांहीही कळवीले जाणार नाही. तसेच कोणताही पत्रव्यवहार केला जाणार नाही याची सर्व अर्जदारांनी नोंद घ्यावी.
10) सदर भरती प्रक्रीयेत पदांचे फेरबदल तसेच भरती प्रक्रीया कोणत्याही कारणास्तव स्थगीत अथवा रद्द करण्याचे अधिकार नियुक्ती प्राधिकाराने राखून ठेवीत आहेत.

**अर्ज पाठविण्याचा पत्ता -: तहसिलदार तथा व्यवस्थापक (प्रशासन)**

**श्री तुळजाभवानी मंदिर संस्थान, तुळजापूर जि.** धाराशिव 413601

कितीं किरण पुजार **(भा.प्र.से.)**

जिल्हाधिकारी, धाराशिव

**तथा अध्यक्ष**

**श्री तुळजाभवानी मंदिर संस्थान, तुळजापूर**

**अर्जाचा नमुना**

| उमेदवाराचे अलिकडील काळातील 3.0 X 4.0 से.मी. आकाराचे छायाचित्र |
|---|

| | | |
|---|---|---|
| 1. | उमेदवाराचे संपुर्ण नाव | |
| 2. | **जन्मतारीख (दाखला जोडणे आवश्यक)** | |
| 3. | **सेवानिवृत्तीचा दिनांक** | |
| 4. | **शैक्षणिक अर्हता (दाखला जोडणे आवश्यक)** | |
| 5. | **कामाचा अनुभव** | |
| 6. | **पत्रव्यवहाराचा पत्ता** | |
| 7. | कुठल्याही प्रकारची विभागीय चौकशी प्रस्तावित/चालू आहे काय? | |
| 8. | **निवृत्तीपूर्वीचे वेतन/भत्ते बाबत दाखला (सोबत जोडावा)** | |
| 9. | निवृत्ती वेतन मंजुरीचे आदेश/दाखला (सोबत जोडावा) | |
| 10. | सेवापुस्तकाच्या पहिल्या पानाची छायांकित प्रत. | |

दिनांक-:

**अर्जदाराची स्वाक्षरी /-**

**(अर्जदाराचे नाव-:** )